REGISTERED No. B 3434.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २० ऑगस्ट १९४७ अंक ३४

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

### युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण

वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

# विविध माहिती

**मद्रासमधील अन्नधान्य परिस्थिति**—मद्रासचे अन्नमंत्री डॉ. राजन् यांनीं प्रांताच्या अन्नधान्य परिस्थितीविषयीं नुकतेच असे उद्गार काढले कीं, सरकारजवळील सध्याचा सांठा लक्षांत घेतला तर ऑक्टोबर १० तारखेपर्यंत ८ औंसाचा शिधा पुरवता येईल. मद्रास प्रांतांतील अन्नधान्याचें उत्पादन ह्यावर्षीं गेल्यावर्षींपेक्षां ५ लाख टनांनीं जास्त आहे. परंतु तें हातांत पडण्यासाठीं अन्न-धान्याच्या वसुलीच्या योजनेशीं जनतेनें सहकार्य करणें जरूर आहे, असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

**अमेरिकेंतील सोन्याचा सांठा**—आजमितीला अमेरिकेंतील सोन्याचा सांठा २१,६०,२०,००,००० डॉलर्सच्या किंमतीइतका आहे. ऑगस्ट ६ ला संपलेल्या आठवड्यांतच अमेरिकेंतील सोन्याचा सांठा ६,५०,०००,०० डॉलर्सच्या किंमतीइतका वाढला.

**कापडाच्या किंमती वाढविण्याला नकार**—कमॉडिटी प्राइस कंट्रोल बोर्डानें कापडाच्या किंमती वाढविण्याला नकार दिला असल्याचें समजतें. कापडाच्या किंमतींत सरसहा वाढ केल्यानें कापडाच्या उत्पादनांत वाढ न होतां नफ्यांत मात्र वाढ होईल असें बोर्डाचें मत आहे. जाड्या भरड्या व तलम कापडाच्या किंमतींत वाढ करण्याचा प्रश्न सरकारनें बोर्डाकडे विचारासाठीं सोपविला होता.

**तेलाच्या खाणींवर कोणाचें नियंत्रण असावें**—प्रथम मध्य पूर्वेंतील तेलाच्या खाणींवर व नंतर सर्व जगांतील तेलाच्या खाणींवर संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका कमिशनचें नियंत्रण रहावें अशी सूचना गेल्या जूनमध्यें इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह अलायन्स या संस्थे-तर्फे करण्यांत आली होती. या सूचनेला विरोध करणारें एक पत्र अमेरिकेच्या चेंबर ऑफ कॉमर्सनें परराष्ट्रमंत्री मि. जॉर्ज मार्शल यांना धाडलें आहे.

**फळांच्या लागवडीची वाढ**–सिंध प्रांतिक सरकारनें प्रांतां-तील फळांच्या लागवडीखालील जमीन वाढविण्याच्या दृष्टीनें एक सप्तवार्षिक योजना तयार केली आहे. सध्यां सिंधमध्यें ४० हजार एकर जमीन फळबागांत गुंतलेली आहे. नवीन योजनेंत हें क्षेत्रफळ १ लाख एकराइतकें वाढविण्यांत येणार आहे. योजनेला प्राथमिक खर्च २७ हजार रुपये येणार असून शिवाय दरवर्षीं २३ हजार रुपये खर्च येईल.

**मादक पदार्थांच्या जाहिरातींना बंदी**—मुंबई प्रांतांत ३१ आक्टोबर, १९४७ नंतर वृत्तपत्रांतून दारूच्या जाहिराती प्रसिद्ध करणें बेकायदेशीर होईल. यासंबंधीं मुंबई सरकारनें एक नोटि-फिकेशन काढून, वरील तारखेनंतर कोणाहि व्यक्तीनें जनतेला मादक पदार्थांचें सेवन करण्याला प्रवृत्त करण्यासारख्या जाहिराती छापणें, प्रसिद्ध करणें अगर प्रसृत करणें हें १८७८ च्या अबकारी कायद्याप्रमाणें बेकायदा ठरविलें आहे.

**तांदुळाच्या उत्पादनांत वाढ झाली पाहिजे**—संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती संघटनेनें जगांतील तांदुळाच्या उत्पा-दनासंबंधीं एक अहवाल तयार केला आहे. आशिया खंडांत गेल्या दोन वर्षांत तांदुळाचा तुटवडा पडला आणि त्याच सुमारास जगांत गव्हाचाही तुटवडा पडला. त्यामुळें सध्याचे अन्नधान्याचे बिकट प्रश्न उत्पन्न झाले आहेत. युद्धापूर्वीं जितका तांदूळ निर्यात होत असे त्याच्या ३८ टकेच तांदूळ गेल्या दोन वर्षांत निर्यात झाला. त्यामुळेंच हिंदुस्थान, चीन, सिलोन, मलाया, इंडोने-शिआ इत्यादि देशांतून अन्नधान्याचा प्रश्न अवघड झाला.


## गोवर्धन डेअरी फार्म्स लि.

गोवर्धनवाडी, पुणें १

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ सरदार के. आर. विंचूरकर, बी. ए., एलएल. बी., जहागिरदार, पुणें ( चेअरमन )
२ सरदार व्ही. डी. पानसे, जहागिरदार, पुणें.
३ श्रीमंत जी. व्ही. साळवेकर, बी. ए., मुंबई.
४ श्री. एस. एस. निसळ, जहागिरदार व बँकर, अहमदनगर.
५ श्री. एस. जी. लोंबार, मर्चंट, पुणें.
६ सरदार अमरसिंहराव कदम, पुणें.
७ रावसाहेब वाय. डी. खोले, पुणें. ( स्पेशल डायरेक्टर )
८ श्री. व्ही. एस. सोलापूरकर, लँडलॉर्ड, पुणें. ( अधिकारपरत्वें )

—मॅनेजिंग एजंटस—

★ मेसर्स सोलापूरकर अँड डोणवाड. ★

### कंपनीचीं वैशिष्ट्यें

★ कंपनीनें आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री, ट्रॅक्टर वगैरे आणविलीं असून तिच्या सहाय्यानें शेतीचीं सर्व कामें करून घेणार आहेत.

★ कंपनीनें बाजारभाव सुमारें १ लक्ष रु. असलेली जमीन माफक किंमतीस मिळविली आहे.

★ कंपनीच्या डेअरीमध्यें फक्त गाई — सिंधी गाईच — आहेत.

★ पहिल्याच वर्षीं कंपनीनें ६% व ३% डिव्हिडंड दिलें आहे.

**शेअर्स विकीस काढलेले आहेत.**

डिपॉझिट रकमा स्वीकारल्या जातात.

| व्याजाचे दर— | १ वर्ष | २ वर्षें | ३ वर्षें |
|---|---|---|---|
| | ४% | ५% | ६% |

—अधिक माहितीसाठी चौकशी करावी—

मॅनेजिंग एजंटस

## रामतीर्थ ब्राह्मी तेल



[ स्पेशल नं. १ ]
सर्वत्र मिळतो.
पांढरे केस काळे होतात. स्मरण-शक्ति वाढते. टक्कलावर केस उग-वतात. शांत झोंप येते. दृष्टि सुधारते. केंस लांबसडक होतात. केसांची नीट निगा राखते. डोकें-दुखी थांबते.

मोठी बाटली रु. ३–८–०, लहान बाटली रु. २–०–०

रामतीर्थ योगाश्रम, ४४८ सॅण्डर्स्ट रोड, मुंबई ४

# अर्थ

बुधवार, ता. २० ऑगस्ट, १९४७

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.




प्रो. वा. गो. काळे

## ब्रिटिश, फ्रेंच व डच साम्राज्यांचें विसर्जन?

### हिंदी स्वातंत्र्याचे निमित्तानें राष्ट्रसीमांचा आढावा

गेलें महायुद्ध संपलें, त्यास दोन वर्षें झालीं आणि आतां जगांतील राष्ट्रांच्या सरहद्दी बऱ्याच अंशीं निश्चित झाल्या आहेत. हिंदुस्थान व पाकिस्तान ह्या दोन स्वतंत्र राष्ट्रांचा उदय झाला आहे आणि त्यामुळें जगाच्या नकाशांत महत्वाचा बदल झाला आहे. इतर राष्ट्रांच्या सरहद्दी कशा पालटल्या आहेत ह्याची कल्पना खालील वर्णनावरून येईल. एका अमेरिकन मासिकांतून ही माहिती घेतलेली आहे.

### रशिया

रशियाचें युरोपांतील प्राबल्य, हा गेल्या महायुद्धाचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम आहे. रशियास कांहीं नवीन प्रदेश मिळाला आहे व कांहीं प्रदेशावर त्याची अप्रत्यक्ष सत्ता चालत आहे. खालील आकडे पहाः—

| | |
|---|---|
| युद्धपूर्व क्षेत्र | ८१,७३,००० चौ. मैल |
| युद्धोत्तर क्षेत्र | ८४,३९,००० चौ. मैल |
| युद्धपूर्व लोकसंख्या | १७,००,००,००० |
| युद्धोत्तर लोकसंख्या | १९,३०,००,००० |

एस्टोनया, लॅटव्हिया व लिथ्वेनिआ हे रशियांत समाविष्ट झाले आहेत आणि त्यास पोलंडचा मोठा भाग व जर्मनी, फिनलंड, झेकोस्लोव्हाकिया आणि रुमेनिया ह्यांचे कांहीं भाग मिळाले आहेत. आशियांतहि रशियानें कांहीं जपानच्याात मुलूख मिळविला आहे. ह्या सर्व प्रदेशाचें क्षेत्रफळ सध्याच्या जर्मनी इतकें भरतें, आणि रशियाची सरहद्द पश्चिमेकडे २०० मैल सरकली आहे. पूर्व युरोपांत रशिआशीं सख्य असणारीं सरकारें प्रस्थापित झालीं असल्याकारणानें बाल्टिक ते ॲड्रिॲटिक रशियाचें वर्चस्व प्रस्थापित झालें आहे, असें म्हणतां येईल.

### पोलंड

पोलंडचें स्वरूप पुष्कळच पालटलें आहे. बाल्टिकचे बाजूस त्यास आतां मोठा समुद्रकिनारा मिळाला आहे. व्हिश्च्युला नदीवरहि त्यास प्रभुत्व प्राप्त झालें आहे. पोलंड हें आतां खरोखरच पोल लोकांचें राष्ट्र उरलें आहे. कारण, रशियानें घेतलेल्या भागांत युक्रेनिअन्स व श्वेत रशियन्सचीच वस्ती होती, ज्यू लोकांचा हिटलरनें नायनाट केलेला आहे आणि उरलेल्या जर्मनांना हाकून दिलेलें आहे.

| | |
|---|---|
| युद्धपूर्व क्षेत्र | १,५६,००० चौ. मैल |
| रशियानें घेतलेलें क्षेत्र | ६९,००० चौ. मैल |
| जर्मनीकडून मिळालेलें क्षेत्र | ३३,००० चौ. मैल |
| सध्याचें क्षेत्र | १,२०,००० चौ. मैल |

### इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली

इंग्लंडला नवा मुलूख कोठेंहि मिळाला नाहीं. फ्रान्सला इटलीकडून थोडीफार प्राप्ती झाली व जर्मनीची कोळशाची 'सार पट्टी' मिळाली. जर्मनीनें आपल्या मुलखापैकीं २५% मुलूख गमावला. इटलीचा कांहीं मुलूख फ्रान्सकडे व कांहीं युगोस्लाव्हियाकडे गेला. डोडाकेनीज बेटें ग्रीसकडे गेलीं. आफ्रिकेंतील वसाहती इटलीनें सर्वस्वी गमावल्या.

### साम्राज्यांचा अंत

जपानचें सर्व साम्राज्य लयास गेलें आहे. चीन, रशिया, अमेरिका ह्यांत जपानच्या साम्राज्याचा बराच मुलूख वाटला गेला. युद्ध काळांत जिंकलेला सर्व मुलूख जपानला ओकावा लागला. ब्रिटिश, फ्रेंच व डच साम्राज्येंहि संपुष्टांत येण्याच्या मार्गावर आहेत. ४० कोटि लोकसंख्येच्या हिंदुस्थानास आतां स्वराज्य मिळालें आहे. त्याचा आशियांतील व इतर ठिकाणच्या परतंत्र राष्ट्रांवर परिणाम झाल्याविना रहाणार नाहीं. २½ कोटी लोकसंख्येचा इंडोचायना जाऊं न देण्याची फ्रान्सची पराकाष्ठा चालू आहे. ७ कोटि लोकसंख्येच्या इंडोनेशियास नेदरलंड्स सरकारनें स्वायत्त वसाहतीचा दर्जा दिला आहे परंतु तेथें आतां वांधा निर्माण झाला आहे. आफ्रिकेंतच फक्त अद्याप इंग्लंड व फ्रान्स ह्यांचें साम्राज्य पूर्णपणें टिकून आहे. परंतु तेथील परिस्थितीहि पालटत आहे.

ब्रिटिश, फ्रेंच व डच साम्राज्यांचें सामर्थ्य नष्ट झाल्यानंतर रशिया व अमेरिका हीं दोनच प्रमुख बलवान राष्ट्रें शिल्लक रहातात आणि त्यांचेमधील सलोख्यावरच जगाचें भवितव्य अवलंबून आहे. ग्रीस, तुर्कस्तान, अरबस्तान, इराण, चीन, कोरिया, इत्यादि ठिकाणापर्यंत अमेरिकेनें आपली राजकीय व लष्करी सीमा नेऊन भिडविली आहे. युरोपांतील देशांना आर्थिक सहाय देण्याची मार्शल योजना हाहि अमेरिकन अधिकारक्षेत्राच्या विस्ताराचाच एक भाग आहे. रशियाच्या वाढत्या सामर्थ्यास अमेरिकेखेरीज प्रतिस्पर्धी उरलेला नाहीं आणि ही भूमिका अमेरिका जाणूनबुजून पत्करीत आहे. हिंदी राष्ट्र बलवान होऊन तें अमेरिका व रशिया ह्यांच्या बरोबरीस लवकर येऊन बसो व त्याचे हातून जागतिक शांततेच्या बाबत टिकाऊ कामगिरी घडो अशी सर्व हिंदवासीयांची इच्छा आहे.

---

### कापडाच्या गिरण्यांची यंत्र-सामुग्री

हिंदुस्थानांत कापडाच्या गिरण्यांना लागणारी यंत्र-सामुग्री तयार करणारी पहिली कंपनी १९३९ सालीं नोंदविली गेली. पण १९४२ सालीं ती युद्धप्रयत्नासाठी सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली. १९४५ सालीं सरकारनें ती परत मूळ मालकांच्या ताब्यांत दिल्यावर उत्पादनाला प्रारंभ झाला. युद्धकालीं ह्याच प्रकारच्या यंत्र सामुग्रीच्या उत्पादनाच्या आणखी दोन कंपन्या काढल्या गेल्या. आणखी एक कंपनी मुंबई प्रांतांत निघणार आहे. ह्या उद्योग धंद्यातर्फे टॅरीफ बोर्डाकडे संरक्षणाची मागणी करण्यांत आली होती. परंतु बोर्डानें ही मागणी अकाली आहे असें म्हणून चौकशी १९४८ पर्यंत स्थगित ठेवण्याची सूचना केली आहे. बोर्डाच्या मतानें, सध्या ह्या धंद्याचें उत्पादन इतकें कमी आहे कीं परदेशांतून आणलेल्या मालाच्या किंमतीशी ताडून पहाण्याकरितां देशांतील त्याच मालाच्या उत्पादनाची किंमत नीटशी अजमावतांच येणार नाहीं. अशा परिस्थितींत संरक्षणाची प्रस्तुत मागणी ही धंद्याच्या वाढीसाठी असून स्पर्धेत टिकण्यासाठी नव्हे, असा बोर्डाचा अभिप्राय आहे.

## ब्रिटनवरील आर्थिक संकटाचें स्वरूप

( लेखकः—प्रा. स. वा. कोगेकर, बी. ए. ( मुं. ); बी. एससी. ( अर्थ ) ( लं. )

गेल्या महिन्यांत ग्रेट ब्रिटनची आर्थिक परिस्थिति अत्यंत बिघडली असून तिचा परिणाम त्या देशांतील लोकांचें रहाणीचें मान कमी होण्यांत दिसून येईल अशा बातम्या आलेल्याच आहेत. ब्रिटनवर कोसळलेल्या संकटाचें स्वरूप कशा तऱ्हेचें आहे याची थोडक्यांत चर्चा करण्याचें येथें ठरविलें आहे.

### अमेरिकन कर्जाची योजना

महायुद्धांत ब्रिटनमधील आर्थिक रचना पूर्णपणें बदलावी लागली. नेहमीच्या नागरी उपयोगाच्या वस्तूंऐवजी युद्धास आवश्यक असा दारूगोळा, विमानें, तोफा, इत्यादि वस्तूंचा पुरवठा करावा लागल्यामुळें देशांतील आर्थिक साधनसामुग्रीचा जास्तीत जास्त उपयोग या मार्गानें केला गेला. परंतु त्यामुळें परदेशांतून येणाऱ्या अन्नधान्यादि वस्तू व इतर कच्चा माल यांची किंमत देण्याचें जें साधन—म्हणजे परदेशी व्यापार—तें नाहींसें झालें. तथापि अमेरिकेनें देऊं केलेली मदत आणि इंग्लंडच्या अंकित राष्ट्रांवरील सत्तेचा स्वहितासाठी उपयोग या दोहोमुळें युद्धकालांतील गरजा कशाबशा निभावून गेल्या. महायुद्ध संपतांच अमेरिकेनें आपली "उधार-उसनवार" मदत बंद केली. युद्धकार्यास आवश्यक ठरलेल्या वस्तूंची निपज करण्याचेंही कारण उरलें नाहीं. परंतु सहा वर्षेपर्यंत बदलत गेलेली आर्थिक रचना पुनः युद्धपूर्व स्थितीवर परत आणणें सोपें नव्हतें. त्यासाठी करावी लागणारी पुनर्घटना कांहीं कालानेंच फलद्रूप होणार होती. या मध्यंतरीच्या कालांत परदेशांकडून आवश्यक त्या वस्तूंची आयात करणें जरूर होतें. पण त्याबदली परदेशांस पाठविण्यासारख्या गोष्टींचा तुटवडा होता. यांतून मार्ग काढण्यासाठीं ब्रिटननें डिसेंबर १९४५ मध्यें अमेरिकेकडून एक मोठें कर्ज काढलें. या कर्जाचा उपयोग आयातीची किंमत देण्यास व देशांतील आर्थिक व्यवस्था शांतता कालास अनुरूप अशी बनविण्यास होणार होता. कर्जाची रकम ९३ कोटी, ५ लक्ष पौंड ( ३७५ कोटी डॉलर ) होती. १९५१ पर्यंत ही रकम लागेल त्या प्रमाणांत हप्त्याहप्त्यानें मिळावयाची होती. कर्जफेड शे. २ टक्के व्याजानें १९५१ ते २००१ पर्यंत व्हावयाची, असेही ठरलें होतें.

परंतु या कर्जाबरोबरच अमेरिकेनें ब्रिटनवर कांहीं इतर अटीही लादल्या. त्यांपैकीं मुख्य अट अशी कीं कर्जास असेंब्लीची मान्यता मिळाल्यापासून एक वर्षानंतर ब्रिटनशीं व्यापार करून मिळालेल्या रकमेचें रूपांतर इतर कोठल्याहि चलनांत करण्याची मुभा इतर देशांना देण्यांत यावी. ही अट अमेरिकेच्या भावी व्यापाराच्या दृष्टीनें फार महत्त्वाची होती. याचें कारण असें कीं, युद्धकालांत ब्रिटननें आपल्या आर्थिक वर्चस्वाखालीं येणाऱ्या देशांस देणें असलेली पौंडांतील रकम इतर चलनांत बदलून घेण्याबाबत बरींच बंधनें घातलीं होतीं. अशा देशांतील परस्पर व्यापार अनिर्बंध चालूं दिला होता. परंतु या देशांच्या बाहेरील जगाशी व्यापार करावयाचा असल्यास मात्र हुंडणावळीवरील बंधनांमुळें अडचणीचें झालें होतें. बाहेरील देशांशीं व्यापार करून त्या बदली मिळालेली डॉलरमधील रकम एका मध्यवर्ति खात्यांत जमा करण्यांत येई व यांतून युद्धकार्यास पोषक अशाच कारणासाठी ठराविक प्रमाणांत ती वाटली जाई. डॉलरचा उपयोग करूनच मुख्यतः युद्धकार्यासाठी माल आणणें आवश्यक असल्यामुळें ही योजना ब्रिटनच्या व इतर दोस्त राष्ट्रांच्या हिताची होती.

### डॉलर्सचा तुटवडा

युद्धसमाप्तीनंतरही ही योजना अशीच पुढें चालविण्याची ब्रिटनची इच्छा होती. परंतु त्यामुळें या योजनेंत समाविष्ट झालेल्या देशांशीं होणाऱ्या अमेरिकेच्या व्यापारावर बंधन येणार असल्यामुळें ब्रिटनला देऊं केलेल्या कर्जाच्या जोरावर ही योजना बंद करण्याची अमेरिकेनें मागणी केली, व ती ब्रिटनला मान्य करणें भाग पडलें. फक्त १२ महिन्यांची मुदत ब्रिटनला देण्यांत आली. ही मुदत १५ जुलै १९४७ ला संपली व त्या दिवसापासून चालू व्यापारामुळें ब्रिटनकडून निघणारे येणें इतर देशांस कोणत्याही चलनांत मागतां येऊं लागलें. आज जगांत माल मिळविण्यासाठी प्रत्येक देश अमेरिकेकडे पहात असल्यामुळें हें देणें डॉलरमध्येंच मागितलें जातें हें सांगणें नकोच.

ब्रिटनला परदेशांतून मालाची आयात केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारखान्यांस लागणारा कच्चा माल आणि खाद्यवस्तू या दोन्ही आर्थिक जीवनास आवश्यक असल्यामुळें त्यांची आयात किमान मर्यादेपर्यंत केलीच पाहिजे अशी त्या देशाची परिस्थिति आहे. पण याप्रमाणें आयात करतांना त्या बदली पक्का माल देणें, व तो धनको देशांना किफायतशीर वाटेल अशा भावानें देणें, आज ब्रिटनला शक्य नाहीं. त्यामुळें आयात व निर्यात यामध्यें तफावत पडते. १५ जुलैनंतर ही तफावत डॉलरच्या रूपानें भरून काढणें जरूर झालें आहे.

ब्रिटननें आपल्या आर्थिक पुनर्रचनेस मदत म्हणून कर्जाऊ घेतलेल्या डॉलरांचा कांहीं भाग अशा रीतीनें चालू आयातीप्रीत्यर्थ खर्ची पडूं लागला आहे. त्याशिवाय अमेरिकेंतून जो माल आर्थिक पुनर्घटनेस आवश्यक म्हणून आणला जातो त्याच्या किंमतींत ४० टक्के वाढ झाली आहे. त्यामुळें कर्ज काढतांना त्याची प्रत्यक्ष वस्तूंच्या रूपांत जी किंमत वाटली होती तीहून ती बरीच घटलेली आहे. त्याचा परिणामही त्याच वस्तूंपायी ४० टक्के अधिक डॉलर खर्च होण्यांत झालेला आहे. इकडे ब्रिटनची आर्थिक पुनर्रचना मात्र पुरी झाली नसल्यानें वाढत्या किंमतीचा निर्यातवाढ करून पूर्ण फायदा घेतां येत नाहीं. फक्त आयात व निर्यात यांच्या किंमतींतील अंतर वाढतें आहे.

या प्रकारामुळें १९५१ पर्यंत चालणारें कर्ज १९४७ च्या आक्टोबर अखेरच संपुष्टांत येणार आहे. चालू सालीं एकंदर ७० कोटी पौंडांची तूट ब्रिटिश व्यापारी जमाखर्चांत येईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत व ही तूट भरून काढण्यास अमेरिकन कर्जही आतां पुरें पडणार नाहीं. अर्थमंत्री डॉल्टन यांनीं पार्लमेंटांत निवेदन केल्याप्रमाणें जरी सुमारें ६० कोटी पौंड इतकी डॉलरच्या रूपांतील शिलक ब्रि. सरकारजवळ असली तरी ब्रिटन हें ऋणको राष्ट्र असल्यामुळें इतर देशांच्या कर्जाची कांहीं अंशीं परतफेड करण्यासाठी यापैकी बरीच रकम लागेल व अडीअडचणीसाठीं देखील त्यापैकी कांहीं भाग राखून ठेवावा लागेल.

### हिंदुस्थानाची कुचंबणा

तेव्हां आता या परिस्थितींतून मार्ग कोणता ? यासाठी आयात कमी करणें, निर्यात वाढविणें, रहाणीचें मान कमी करणें, काम अधिक करणें, परदेशांत सैन्यें वगैरेमुळें होणारा खर्च कमी करणें, इत्यादि गोष्टी पुढें येतात व या सर्वांचा कमी-अधिक प्रमाणांत अवलंब करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. नुकताच ॲटली सरकारनें पार्लमेंटांत एक कायदा पास करून घेतला असून त्यायोगें सरकारला आर्थिक नियंत्रणासंबंधी युद्धकालांतल्याप्रमाणें सर्वाधिकार मिळाले आहेत. आयातींत २० कोटि पौंडांची कपात

( पान ३१७ पहा )

## स्वतंत्र हिंदुस्थानचें परराष्ट्रीय राजकारण

(२)

लेखक:—श्री. विश्वनाथ त्रिंबक शेटे, बी. ए., एलएल्. बी.

परराष्ट्रीय राजकारणांचें एक प्रमुख महत्त्वाचें सूत्र आपण आपल्या डोळ्यापुढें सतत ठेवलें पाहिजे. तें म्हणजे राजकारणांत आपले कायमचे शत्रू किंवा कायमचे मित्र कोणीच असूं शकत नाहीं. वेळोवेळींच्या परिस्थितींत आपल्या राष्ट्राचा फायदा कसा होऊं शकेल इकडे अवधान ठेवून- व तो साधून घेतांना आपणाला कोणाचा उपयोग अधिक होऊं शकेल व तसा तो करून घेतांना त्यांच्यांतील जोरदार कोण व कमजोर कोण हा विवेक मनांत बाळगून आपणांस आपले शत्रू-मित्र ठरवावे लागतील; आणि राष्ट्राराष्ट्रांतील शत्रूमित्रांचें हें राजकारण खेळवितांना आपल्याला कोणत्या तरी एका सुसंगत व सुबुद्ध तत्त्वप्रणालीचा आश्रय घ्यावा लागेल.

### उदात्त ध्येयाची आवश्यकता

या अनुषंगानें एक महत्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. कोणत्याही महान् राष्ट्राला आपल्या डोळ्यांपुढें एखादें विशिष्ट ध्येय ठवावें लागतें. हिंदुस्थानची भौगोलिक परिस्थिति, प्राचीन उज्ज्वल परंपरा व नैसर्गिक साधनसंपन्नता हीं सर्व लक्षांत घेऊन हिंदुस्थाननें जागतिक महत्त्वाचें राष्ट्र होण्याचा प्रयत्न केला व तें ध्येय म्हणून जर अंगिकारलें तर त्यांत हंसण्यासारखें कांहीं होणार नाहीं. या जगांत हिंदुस्थान हें पेरू, चिली, अबीसीनीया किंवा इराण, सीरिआ, ट्रान्सजॉर्डन, यासारखें एखादें भौगोलिक राष्ट्र रहाणार नाहीं; तर जागतिक राष्ट्रांच्या स्पर्धेत मानाचें स्थान मिळविणारें व कांहीं एक विशिष्ट भूमिका असलेलें असें हें आपलें राष्ट्र राहणार आहे. तेव्हां या भूमिकेवरून हिंदुस्थानला आपल्या डोळ्यांपुढें कोणतें तरी एखादें विशिष्ट जागतिक महत्त्वाचें ध्येय ठेवलें पाहिजे; व त्या अनुषंगानें आपल्या परराष्ट्रीय धोरणाचीं चक्रें फिरविलीं पाहिजेत. ज्याप्रमाणें इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, यासारखीं राष्ट्रें आपल्या डोळ्यांपुढें गौरवर्णीयांचें महत्त्व, साम्राज्य संवर्धन व भांडवलशाही, समाजरचना यासारखीं ध्येयें ठेवून आपापल्या परराष्ट्रीय राजकारणाचीं सूत्रें हालवीत आहेत किंवा रशिआसारखें राष्ट्र समाजसत्तावादाची संस्थापना निरनिराळ्या राष्ट्रांत व्हावी हें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून त्या दृष्टीनें आपल्या परराष्ट्रीय राजकारणाची प्यादीं पुढें सरकावीत आहे, त्याप्रमाणें हिंदुस्थाननेंही आपलें अंतर्गत सामर्थ्य पुरेपूर वाढवून व त्यासाठी आर्थिक समतेच्या पायावर आपल्या राष्ट्राची उभारणी करून आशियावासी दलित राष्ट्रांचें पुनरुज्जीवन करणें व आशियांतील राष्ट्रें प्रबळ राष्ट्रांच्या सत्तासंपादनांतील खेळणीं होणार नाहींत असा प्रयत्न करणें हीं ध्येयें पुढें ठेवून आपल्या कुवतीप्रमाणें व दुसऱ्या महान् राष्ट्रांच्या चढाओढींत न सांपडतां परराष्ट्रीय राजकारणाचा चित्रपट रंगवूं शकेल. आजच्या घटकेलाही आशियांत पश्चिम रशिया वगळून पूर्व रशिया घेतला तरी हिंदुस्थानसारखें अनाक्रमक शांततावादी व सामर्थ्यसंपन्नतेचीं बीजें असलेलें दुसरें महान् राष्ट्र सांपडणार नाहीं.

याच दृष्टीनें पाहिलें असतांना लष्करी सामर्थ्यानें प्रमत्त झालेलें जपानचें राष्ट्र या लढाईंत पराभूत झालें ही एक दैवी घटनाच म्हटली पाहिजे. नाहीं तर स्वतंत्र पण शक्तिहीन भारतराष्ट्र व विजयी लष्करी जपानी राष्ट्र यांचें परस्परसंबंध काय स्वरूपाचे राहिले असते याचा तर्कच केलेला बरा. तेव्हां हिंदुस्थानपुढें अनेक शतकांनंतर आलेली ही सुवर्णसंधि जर फलद्रूप व्हावयाची असेल तर वरील प्रकारचें ध्येयवादित्वाचें सूत्र नजरेपुढें ठेवून परराष्ट्रीय राजकारणांत सुसंबद्धता राखून हिंदुस्थानास एक सत्प्रवृत्त महान् राष्ट्र होतां येईल.

### अंतर्गत आघाडी

उत्तम परराष्ट्रमंत्र्याचें धोरण जर पूर्णपणें यशस्वी व्हावयाचें असेल तर त्याला आपल्या गृहमंत्र्याचा पूर्ण पाठिंबा पाहिजे. देशाची अंतर्गत आघाडी जितकी स्थिर, एकसंध व एकविचाराची असेल तितकी या आघाडीवर विश्वास ठेवून आंखलेल्या परराष्ट्रीय धोरणाची यशस्विता अधिक खुलून दिसेल. या दिशेनें विचार केला असतांना हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय राजकारणांतील एक महत्वाचें उपांग अंतर्गत समाजस्वास्थ्य हें आहे.

हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास पाहिला तर हिंदुस्थानला बेकी व फितुरी या दोन राहूकेतूसारख्या दुष्ट ग्रहांनीं ग्रासलेलें आहे. हिंदुसमाजाची समाजरचनाहि या दोषांना थोड्याबहुत फरकानें कारणीभूत आहे. हिंदुसमाज एकसंध, एकविचाराचा व राष्ट्रप्रेमी बनविण्याचा अखंड प्रयत्न यापुढें व्हावयास पाहिजे. हिंदुस्थानांत परस्पराविषयीं असहिष्णु वृत्ति बाळगणारे विभिन्नधर्मीय समाज, तसेंच बाहेरील राष्ट्रांविषयीं प्रेम बाळगणारेही कांहीं समाज व व्यक्तिसमूह आणि देशहितापेक्षां जातिहित आणि व्यक्तिहित पाहाणारे कांहीं वर्ग यांचें कडबोळें झालें आहे. याशिवाय जातिद्वेषानें पेटलेल्या व्यक्ति व समूह आहेत ते निराळेच. यापुढें हिंदुस्थानला निरनिराळ्या परकी देशांत आपल्या वकिलाती उघडण्याचा प्रसंग येणार आहे; त्या वकिलातींतून अनेक लोकांची वर्णी लावण्याचा प्रसंग येणार आहे.

या अनेक प्रकारच्या लोकांना गुप्त बोलणीं व कारस्थानें करावी लागणार आहेत. तेव्हां अशा ठिकाणीं जाणारे लोक आपापल्या व्यक्ती, जाती अगर धर्मीय हितसंबंधाला प्राधान्य देऊन देशहिताशी जर बेइमानी करूं लागतील तर परराष्ट्रीय मंत्री प्रति बृहस्पती असला व त्यानें आंखलेलें धोरण जरी मुत्सद्देगिरीचें असलें तरी त्याचे हे चारचक्षु अविश्वासार्ह असल्यानें त्याच्या पदरीं अपयशच यावयाचें. तेव्हां देशांतील गृहमंत्र्यानें हिंदुस्थानची ही विशिष्ट परिस्थिति लक्षांत ठेवून राष्ट्रप्रेमाची शिकवण व जातिऐक्य हीं दोन प्रमुख सूत्रें डोळ्यांपुढें ठेवून हिंदु समाजाची पुनर्घटना केली पाहिजे आणि डोळ्यांत तेल घालून सक्तपणें या सूत्रांशीं विघातक असणारी व्यक्ती कितीही मोठी असली किंवा तो व्यक्तिसमूह कितीही सामर्थ्यवान् अगर स्नेहरज्जूंनीं संनिबद्ध असलेला असो त्याचें निर्दयपणें निर्मूलन केलें पाहिजे. तेव्हां, यशस्वी परराष्ट्रीय राजकारणाला ज्याप्रमाणें त्याचा पाठपुरावा करणारें उत्तम सुसज्ज लष्करी सामर्थ्य पाहिजे त्याचप्रमाणें त्याला उचलून धरणारा राष्ट्रप्रेमानें ओथंबलेला एकसंघ समाजही पाहिजे.

या प्रकारच्या निरनिराळ्या धोरणावर बारीक नजर ठेवून आपल्या शेजारचीं राष्ट्रें आपल्या राष्ट्रापेक्षां केव्हांहीं अधिक सामर्थ्यवान् न होतील अशी काळजी राखून व त्या धोरणानें परराष्ट्रीय राजकारणाचीं सूत्रें हालवून सध्यां प्रबळ असलेल्या महान् लष्करी सामर्थ्याचा राष्ट्रांच्या चढाओढींत कोणताही पक्ष न स्वीकारतां व कोणाशींही वैर न संपादतां आर्थिक समतेच्या व सामाजिक न्यायाच्या पायावर सुस्थिर झालेल्या हिंदुस्थानला शेजारील राष्ट्रांशीं पूर्ण स्नेहाचे संबंध राखून आशियावासी दलित राष्ट्रांचा उद्धार शांततेनें व प्रसंगविशेषीं समासमतोलनेचेंही तत्त्व स्वीकारून करतां येईल व जागतिक महत्त्वाचें राष्ट्र या परिगणनेंत समाविष्ट करून घेतां येईल.

हिंदुस्थानास पं. नेहरूंच्या सारखा विचारी द्रष्टा आणि सर्वत्र जगांत मान असलेला मुख्य प्रधान आणि परराष्ट्रमंत्री लाभला आहे, ही अत्यंत सुदैवाची गोष्ट आहे. पंडितजींना, हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय धोरणाची आखणी करून तें धोरण यशस्वी करण्याचें आघाडीचें कार्य करावें लागणार आहे. त्यांत त्यांना यश येईल असा सर्वांचा विश्वास आहे. घरची आघाडी मात्र आपण मजबूत केली पाहिजे. (समाप्त)

### नव्या भांडवल उभारणीचा तपशील

एक जानेवारी, १९४७ ते ३१ मार्च, १९४७ पर्यंतच्या पहिल्या तिमाहींत १८५ कंपन्यांना मिळून ८६ कोटी रुपये नवें भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली. ह्या काळांत २४४ कंपन्यांतर्फे एकूण १०२ कोटी रुपये भांडवल उभारण्याची परवानगी मागण्यांत आली. त्यापैकीं ५९ कंपन्यांकडून आलेल्या १२ कोटी रुपये भांडवलाच्या उभारणीच्या मागण्यांना परवानगी नाकारण्यांत आली. संस्थानांतिल कंपन्यांकडून आलेले परवानगीचे अर्ज संस्थानांतून उभारलेल्या भांडवलाला ब्रिटिश हिंदुस्थानांत मान्यता मिळविण्यासाठीच फक्त होते. फक्त संस्थानांतच भांडवल उभारावयाचें असेल तर त्याला हिंदुस्थान सरकारच्या भांडवल नियंत्रक अधिकाऱ्याच्या परवानगीची गरज लागत नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या नियंत्रणाच्या योजनेप्रमाणें नोंद झालेल्या संस्थानांतील भांडवलापेक्षां बहुधा अधिक भांडवल संस्थानांतून उभारलें गेलें असावें.


कारखान्यांच्या प्रकाराप्रमाणें पहावयाचें झाल्यास सुताच्या व कापडाच्या गिरण्यांतर्फे भांडवल उभारणीस सर्वांत अधिक मागणी अर्ज करण्यांत आले. त्यांच्या खालोखाल रासायनिक कारखान्यांचा आणि खाणींचा अनुक्रम लागतो. औद्योगिक भांडवलाव्यतिरिक्त भांडवलाचें वर्गीकरण शेती, व्यापार व वहातूक इत्यादि १८ गटांत करण्यांत आलें आहे. ह्या प्रकारच्या भांडवलांत पहिला अनुक्रम व्यापार व वहातुक कंपन्यांचा लागतो. त्यानंतर बँका, विमा कंपन्या, या गटाचा नंबर लागतो.

### औद्योगिक कलहासंबंधीं एक महत्त्वाचा निवाडा

कानपूर इलेक्ट्रिक सप्लाय कॉर्पोरेशन लि. ही कंपनी आणि तींत काम करणारे कामगार, ह्यांच्यांत उत्पन्न झालेल्या तंट्यांत, ॲडज्युडिकेटरनें दिलेल्या निर्णयामुळें बरेच महत्त्वाचे मुद्दे उपस्थित झाले आहेत. ह्या निर्णयाप्रमाणें, कंपनीचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर कंपनीच्या गंगाजळीपैकी निम्म्यावर कामगारांना मालकी हक्क देण्यांत आला आहे. निर्णयानुसार हुकूम काढला गेला असला तरी संयुक्त–प्रांत सरकारनें त्याचा फेरविचार करावा अशी विनंति मुंबई शेअर बाजारचे अध्यक्ष, श्री. श्रॉफ, यांनीं केली आहे.

श्री. श्रॉफ ह्यांच्या मतानें मजूर वर्ग उत्पादनांत आवश्यक असला तरी त्याची भांडवलाबरोबर समता पूर्णांशानें अगर अल्पांशानेंही अजून मान्य केली गेलेली नाहीं. १९१६ सालापासून कानपूर कंपनींतिल कामगारांना नियमितपणें बोनस वाटण्यांत आलें असलें तरी ती रूढि कंपनीला होणाऱ्या नफ्यापुरतीच मर्यादित आहे. नफा आणि गंगाजळी हे वेगळे असल्यानें गंगाजळीवर कामगारांचा हक्क उपस्थित होत नाहीं. निर्णय अमलांत आणला तर पैसे गुंतविणारांच्या मालकीच्या शिलकींतून ६५ लाख रुपये एका लहानशा वर्गाला अनपेक्षित दिल्यासारखें होईल. भागीदारांना अशा तऱ्हेनें नागविणेंच असेल, तर जनतेकडून तसा आदेश मिळाल्यानंतर कायदा करूनच नागविता येईल. अशा तऱ्हेचा कायदा मंजूर झाला तर स्वतंत्र व लोकशाही समाजांतील आर्थिक जीवनाचा पायाच उखडला जाईल, असें मत श्री. श्रॉफ ह्यांनीं व्यक्त केलें आहे.

–सर्व प्रांतांतील–
सुती – गरम – रेशमी
––खादीचें माहेरघर––
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्यसें झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें!

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

## ब्रिटनवरील आर्थिक संकटाचें स्वरूप

( पान ३१४ वरून चालू )

करणें, खाणींतील कामाची वेळ ½ तासानें वाढविणें, निर्यातित पुढील सहा महिन्यांत युद्धपूर्वकालापेक्षां ४० टक्के वाढ करणें, सैन्यांतील शिपायांची संख्या कमी करून त्यांस उद्योगधंद्यांत कामास लावणें, वांटपाच्या प्रमाणांत कपात करणें इत्यादि अनेक मार्गांनी सरकार या संकटास तोंड देऊं पहात आहे. तसेंच अमेरिकेशी बोलणीं करून कर्ज–करारांतील चलन–रूपांतराच्या अटींत सवलत मिळविण्याची खटपटही चालू आहे.

हिंदुस्थानसारख्या धनको देशांची मात्र यामुळें कुचंबणा झाली असून ब्रिटनकडे शिल्लक असलेल्या सुमारें १२० कोटी पौंड (१६०० कोटी रुपये) रकमेपैकीं येत्या डिसेंबरपर्यंत फक्त ३॥ कोट पौंड मोकळे करण्यांत येणार आहेत व आणखी ३ कोट पौंड रिझर्व बँकेच्या चालू जबाबदाऱ्या पुऱ्या पाडण्यासाठी मिळणार आहेत. बाकीच्या ११३॥ कोटी पौंडांचा प्रश्न पुनः वाटाघाटी करून ठरविला जाणार आहे. पण ब्रिटनच्या आजच्या आर्थिक परिस्थितीमुळें त्यांची सोडवणूक होण्याची आशा दुरावत चालली आहे.

### ब्रिटनच्या मार्गांतील अडचणी

खुद्द ब्रिटनमध्यें पोलादाच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण करण्याची जी योजना सरकारनें हातीं घेतली होती ती तूर्त स्थगित करावी असें दडपण सरकारवर येत आहे. या दडपणांत अमेरिकेचाही हात आहे आणि त्यामुळें ग्रेट ब्रिटनच्या मजूर सरकारांत दुही पडल्याची वार्ता आहे. समाज सत्तावादाचा पुरस्कार करणारे बरेच वजनदार पुढारी सरकारच्या पाठीमागे होते. परंतु चालू बिकट स्थितीचें निमित्त करून समाजवादाला हरताळ फासण्यांत येतो कीं काय या शंकेनें त्यांनीं सरकारला आपल्या ध्येयापासून न ढळण्याचा गंभीर इषारा दिला आहे. कारण चालू आपत्तीवर दीर्घकालीन उपाय राष्ट्रीयकरण हाच आहे. मि. बेव्हिन यांच्या परराष्ट्रीय धोरणामुळेंही ब्रिटिश आर्थिक व्यवस्थेवर ताण पडत असल्यामुळें त्यांत बदल करण्याची मागणीही जोरानें पुढे येत आहे. जर्मनी, पॅलेस्टाईन वगैरेंत नि.सैन्याप्रीत्यर्थ सरकारला खर्च करावा लागतो. उलट तेथें गुंतलेल्या लोकांचा देशांतील उत्पादन वाढविणाऱ्या प्रयत्नाला मुळींच उपयोग होत नाहीं. असा दुहेरी तोटा टाळावयाचा असल्यास परराष्ट्रीय धोरण बदललें पाहिजे.

निर्यात व्यापाराची वाढ करण्याच्या मार्गांतही ब्रिटनला अडचणी येऊं लागल्या आहेत. एक तर अमेरिकेची जेथें तेथें मोठ्या प्रमाणावर चढाओढ होत आहे. आणि दुसरे म्हणजे 'विक्रेता म्हणेल तो माल व विक्रेता म्हणेल ती किंमत' ही गेल्या दोन वर्षांतलि बाजाराची स्थिति झपाट्यानें बदलूं लागली आहे. मालाचा गुण आणि किंमत गिऱ्हाइकाच्या मनाप्रमाणें ठरण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळें चांगला व स्वस्त मालच बाजारांत तग धरूं शकेल. त्यासाठीं आर्थिक व्यवस्था अद्यावत पद्धतीवर बसविली पाहिजे. पण ती गोष्टही आज ब्रिटनला साधलेली नाहीं. यामुळें चोहोंकडून तें राष्ट्र कैचींत सांपडलें आहे.

---

**धनबादला एंजिनिअरिंग कॉलेज**—बिहार सरकारनें धनबाद येथें एक नवे एंजिनिरिंग कॉलेज उघडण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. ह्या कॉलेजला सुमारें २० लाख रुपये खर्च येणार असुन तें बहुधा पुढील वर्षी चालू होईल. कॉलेजांत मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि केमिकल एंजिनिअरिंगचा अभ्यासक्रम ठेवण्यांत येणार आहे.

**मोटार शिक्षणांत आणखी वाढ**—पुणे येथें इन्स्टिटयूट ऑफ ऑटोमोबाईल.इंजिनिअरिंग, या मोटार धंद्यांतलि शाळेची सुरवात, ता. १७ रोजीं श्री. डी. के. सुखटणकर रि. ट्रा. ऑफिसर यांचे अध्यक्षतेखालीं झाली. मोटार कारखान्यांना इंजिनिअरची जरुरी असल्यानें, ती अडचण वरील संस्था दूर करील. श्री. सुखटणकर यांनीं विद्यार्थ्यांना संस्थेच्या नांवाचा खरा अर्थ सांगून उपदेश केला. संस्थेस सरकारी मान्यता मिळाली असल्याचें कळतें. हा कारखाना शंकरशेट रोडवर आहे.

---


सटाणा को. ऑ. परचेस सेल युनिअन लिमिटेड.
जि. नासिक, तारीख १२–८–१९४७.

## नोटीस.

संस्थेची वार्षिक साधारण सभा शनिवार तारीख २३–८–४७ रोजीं दुपारीं २ वाजता ऑफिसांत पोटनियम २१ प्रमाणें विचार करण्यासाठीं भरणार आहे. तरी सभासदांनी वेळेवर हजर रहावें अशी विनंति आहे. मे. कळावे.

कृष्णाजी अजबा पाटील, आर. जी. तिडके,
म्यानेजिंग डायरेक्टर. चेअरमन.

टीप—कंपन्यांनी १ व सामील सोसायट्यांनीं २ प्रतिनिधी निश्चित करून ठरावासह पाठवावे.

---

धी बार्शी सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

## जाहिरात

या बँकेच्या सर्व सभासदांस कळविण्यांत येतें कीं, बँकेची वार्षिक सर्व साधारण सभा शनिवार दिनांक ६ सप्टेंबर १९४७ इ. चे दिवशीं दुपारीं ४ वाजतां बँकेच्या साने मेमोरियल हॉलमध्यें बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करण्याकरतां भरेल. तरी त्यावेळीं सर्व सभासदांनीं उपस्थित रहाण्याची कृपा करावी.

बार्शी
दिनांक १४ ऑगस्ट १९४७

बोर्डाच्या हुकुमावरून
र. प. पटवर्धन
मॅनेजर

---

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी
( सं. औध, जि. सातारा ).

## नोटीस.

अिंटेरिम डिव्हिडंड, १९४७

ता. १०–८–१९४७ रोजी ओगलेवाडी येथें भरलेल्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या सभेंत दर भागास रु. २ ( दोन फक्त) प्रमाणें अिंटेरिम डिव्हिडंड देणेचें ठरलें आहे. तरी सर्व भागीदारांना असें कळविण्यांत येतें कीं, ज्यांचीं नांवें ता. २१–८–१९४७ रोजीं कंपनीचे रजिस्टरवर दाखल असतील अशा भागीदारांनाच वरील डिव्हिडंड दिले जाअील.

डिव्हिडंडच्या रकमा पाठविण्याची सुरवात ता. २१ आक्टोबर १९४७ पासून अनुक्रमानें होईल. तरी ज्यांचे पत्ते बदलले असतील त्यांनीं ते कंपनीस जरूर कळवावेत.

कंपनीचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें सोमवार ता. १ सप्टेंबर १९४७ ते बुधवार तारीख १० सप्टेंबर १९४७ अखेर बंद रहतील.

ओगलेवाडी
ता. १०–८–१९४७

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकुमांवरून
अेस. पी. ओगले आणि कंपनी.,
मॅनेजिंग अेजंटस.

# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८१ | "Cencobank" | नं. ११ |

**मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

–: शाखा :–

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

**द. दि. चितळे**
मॅनेजिंग डायरेक्टर

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवलः— | रु. ५०,००,००० |
| खपलेलें भांडवलः— | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवलः— | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडः— | रु. ३,९०,००० |
| एकूण खेळतें भांडवलः— | रु. २,००,००,००० |

## —:बोर्ड ऑफ डायरेक्टर्सः—

श्री. धों. कृ. साठे, (चेअरमन) श्री. वा. पुं. वर्दे (व्हा. चेअरमन) श्री. न. गं. पवार, श्री. श्री. गो. मराठे, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुप्ते, श्री. मो. रा. ढमढेरे.

शाखाः–डेक्कन जिमखाना (पुणें), खडकी, मुंबई (फोर्ट), मुंबई (गिरगांव), नाशिक, चाळीसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर (पे. ऑफिस), नागपूर (सितावर्डी), नागपूर (इतवारी), रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कल्याण इ.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शिवाय ट्रस्टी आणि एक्झिक्यूटरचे व्यवहाराबाबत चौकशी करावी.

**चिं. वि. जोग**
मॅनेजर.

दी

# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*( कोल्हापूर येथें सन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागीदारांची मर्यादित जबाबदारी असलेली. )*

एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | |
|---|---|
| आधिकृत भांडवल | रु. ४०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २०,२६,००० |
| भरलेलें (३०-६-४७) | रु. ३,०५,४७० |
| रिझर्व्ह (३०-६-४७) | रु. ५,८६,६६० |

एकूण खेळतें भांडवल रु.२,००,००,००० हून अधिक

मुख्य कचेरी--बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी–कोल्हापूर.

शाखा : संस्थानांतीलः—(१) शाहुपुरी–कोल्हापूर, (२) गुजरी–कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ–वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. संस्थाना-बाहेरीलः—(८) मुंबई, (९) निपाणी (जि. बेळगांव)

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

★ मौल्यवान चीजवस्तु सुरक्षित ठेवणेसाठी हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

व्ही. प. सावंत, अॅ. मॅनेजर

# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : ७ सप्टेंबर, १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | : | २,००,००,००० रु. |
| वसूल झालेलें भांडवल | : | १,५०,००,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | : | २,००,००,००० रु. |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

—शाखा—

| | | |
|---|---|---|
| अहमदाबाद | काळबादेवी | कराची |
| भद्र (मुख्य ऑफिस) | मलबार हिल | मद्रास |
| एलिस ब्रिज | कलकत्ता | नागपूर |
| माणेक चौक | क्लाईव्ह स्ट्रीट (मुख्य ऑफिस) | किंग्जवे |
| स्टेशन ब्रँच | | इतवारी बझार |
| अमृतसर | बडा बझार | पुणें |
| अंधेरी (मुंबई शेजारीं) | चौरंगी स्केअर | पुणें शहर |
| बांद्रे (मुंबई शेजारीं) | कालिकत | पालनपूर |
| भुज (कच्छ) | कोइमतूर | राजकोट |
| मुंबई | हैद्राबाद (सिंध) | सोलापूर |
| बुलियन एक्सचेंज | जमशेदपूर | सुरत |
| कुलाबा | जुनागड | वेरावळ |

लंडन शाखा : १७, मूर गेट, लंडन ई. सी. २

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.
तपशीलासाठी चौकशी करा.

वी. एन. अटल, एजंट, पुणें

ए. सी. क्लार्क, जनरल मॅनेजर

## टाटा आयर्न अँड स्टील कं. लि.

### १९४६–४७ च्या रिपोर्टांतील कांहीं तपशील

( १ ) घसाऱ्याचे १½ कोटि रु. व ६९,८७,५६० रु. रिझर्व्ह फंडाचे बाजूस काढून आणि कर, कामगारांस बोनस, इत्यादींची पुरी तरतूद करून कंपनीस १,८६,२९,५९४ रु. निवळ नफा झाला. भागीदारांत व्हावयाच्या त्याच्या वाटणीची माहिती "अर्था"त आलेलीच आहे.

( २ ) कंपनीचा एकूण ताळेबंद ५३ कोटि, ९५ लक्ष रुपयांचा आहे. त्यांत १०,४७,२३,८६० रुपयांचें भाग भांडवल असून ६,५०,०४,००० रुपयांचा रिझर्व्ह फंड आहे. घसारा फंडांत २१,२०,८९,२७६ रु. आहेत. कंपनीनें बँकांकडून २,१५,१२,३९३रु. चीं कर्जें घेतलेलीं असून त्यांस ४% फर्स्ट मार्टगेज डिबेंचर स्टॉक तारण लावून दिलेला आहे. विना तारण कर्जाची रकम २४,७६,२८६ रु. आहे. करासाठी रिझर्व्ह ३,६९,५४,५४२ रुपयांचा आहे.

( ३ ) अहवालाचे वर्षीं कंपनीनें २१¼ कोटि रुपयांची मालविक्री केली आणि ४¾ कोटि रु. ठोक नफा मिळविला. त्यांतून घसारा ( १,५०,००,००० रु. ), बोनस (१,०७,५५,६५५ रु.), रिझर्व्ह फंड ( ६९,८७,५६० रु. ) अशी वाटणी करून निवळ नफा १,८६,२९,५९४ रु. रहातो.

( ४ ) कंपनीनें अहवालाच्या वर्षीं डायरेक्टरांना मेहेनताना म्हणून फक्त २५,९५० रु. दिले आहेत. त्यापूर्वीच्या वर्षीची रकम ३०,३०० रु. होती. ऑडिट फी १०,००० रु. दिली. जमशेटपूर येथील कारखाना आणि कंपनीच्या लोखंडाच्या व कोळशाच्या खाणी ह्यांच्या त्रैमासिक ऑडिटसाठी ४०,००० रु. दिले.

( ५ ) मॅनेजिंग एजंटांना कमिशनचे ४४,२६,८६९ रु. मिळाले.

( ६ ) कंपनीनें अहवालाच्या वर्षीं सरकारला वेगवेगळ्या स्वरूपांत मिळून ६ कोटि, ६१ लक्ष रु. दिले. त्याचा तपशील असा:— इनकम टॅक्स वगैरे: ३ कोटि, ११ लक्ष रु.; एक्साइज ड्यूटी, ४१ लक्ष रु.; कस्टम्स ड्यूटी: ७½ लक्ष रु.; रेल्वे फ्रेट: २ कोटि, ५७ लक्ष रु.; इतर: ४४ लक्ष रु.

( ७ ) कंपनीची मॅनेजिंग एजन्सी मेसर्स टाटा सन्स लि. कडे होती, ती १ जुलै, १९४६ पासून टाटा इंडस्ट्रीज लि. कडे वर्ग करण्यांत आली.

---

**अधिक धान्य पिकविण्याचे प्रयत्न**—गेल्या जून महिन्यांत मध्यवर्ती सरकारच्या शेतकी खात्यानें अधिक धान्य पिकविण्या· संबंधींच्या २३ प्रांतिक मोहिमांना मान्यता दिली. ह्या सर्व योजनांना मिळून २७ लाख रुपयांपेक्षा थोडा अधिक खर्च येईल. वरील रकमेपैकी मुंबई प्रांताच्या वाट्याला २४ लाख रुपये आले असून त्यांचा विनियोग यांत्रिक शेती, खतपाणी, चांगलें बीं-बियाणें, कीड प्रतिबंधक उपाय, ह्यांच्यासाठी करावयाचा आहे. मुंबई प्रांताशिवाय बिहार, मध्यप्रांत, मद्रास, वायव्य सरहद्द प्रांत, पंजाब व त्रावणकोर संस्थान ह्यांनाही आर्थिक मदत देण्यांत आली आहे.

**हिंदुस्थान सरकारची कर्ज फेड**—हिंदुस्थान सरकारनें १९४७-५० चें ३½ टक्के व्याजाच्या दराचें कर्ज ता. १५ नोव्हेंबरला व्याजासह दर्शनी किंमतीला परत करण्याचें ठरविलें आहे. १५ नोव्हेंबर १९४७ पासून पुढें या कर्जरोख्यावर व्याज देण्यांत येणार नाहीं.


**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

**१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.**

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली**

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ७१,२२० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० चे वर | रुपये |
| खेळतें भांडवल | ९,००,००० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर




आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

**दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी**

९६ नारायण पेठ, पुणें २.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:–९७४ सदाशिव, लक्ष्मीरोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.–

ब्रँच सेक्रेटरी







## दि बँक ऑफ औंध लि.

(औंध संस्थानांत स्थापन झालेली–भागीदारांची जबाबदारी नियमित)

रजिस्टर्ड ऑफिस:—औंध

—: मुख्य बिझिनेस ऑफिस:—

१११।१११ सदाशिव पेठ, सातारा शहर.

–औंध संस्थानांतील शाखा–

आटपाडी, थिघूद रे. स्टे. व ओगलेवाडी.

- चालू, मुदतीच्या व सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.
- तीन वर्षे मुदतीचीं कॅश सर्टीफिकेटस् विकत मिळतात.
- योग्य तारणावर कॅश क्रेडिट्स्, कर्जे व ओव्हर ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठीं समक्ष अगर पत्रद्वारें चौकशी करा.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

## आरको

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तु

आरको निलगिरी तेल

लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें




## धूतपापेश्वर औषधें

श्री धूतपापेश्वर पनवेल लिमिटेड पनवेल-कुलाबा




पुणें डेपो—सिटी पोस्टासमोर, : नागपूर—महाल रोड,

कोल्हापूर—महाद्वार रोड.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.